
# व्हाईट नॉईज

## लेखक : डॉन दलीलॉ



“आज रात्री पाऊस पडेल.”

“पाऊस पडतोय आत्ता.”, मी म्हटलं.

“रेडियोवर सांगितलं होतं, की रात्री पाऊस पडेल.”

ताप आणि घसादुखीतून बरं झाल्यानंतरचा हा त्याचा पहिला दिवस होता आणि मी त्याला शाळेत घेऊन जात होतो. पिवळा स्टीकर लावलेली एक बाई ट्राफिक थांबवून मुलांना रस्ता ओलांडायला मदत करत होती.

“पुढची काच पहा बरं,” मी म्हटलं, “आहे की नाही पाऊस?”

“घोषणा काय झाली होती, ते फक्त मी तुम्हाला सांगतोय.”

“रेडियोवर काहीही सांगितलं असेल, तरी आपण प्रत्यक्ष ऐंद्रिय पुराव्यांवर, जे दिसतंय त्यावर विश्वास ठेवणं सोडून द्यावं, असा त्याचा अर्थ होत नाही.”

“ऐंद्रिय पुरावे? आपल्या इंद्रियांमुळे अनेकदा आपण बरोबर ऐवजी चुकीचे निष्कर्ष काढतो. ही गोष्ट प्रयोगशाळेमध्ये सिद्ध झालेली आहे. तुम्हाला तो सिद्धांत माहीत नाही का? त्यात असं म्हटलंय की, ‘कोणतीही गोष्ट दिसते, तशी नसते’आपल्या मनापेक्षा वेगळं भूत, वर्तमान किंवा भविष्य, काहीच नसतं. गतीचे नियम ही खरं तर एक मोठी फसवणूक आहे. आवाजाने सुद्धा मन धोका खातं. कोणताच आवाज ऐकू येत नसेल, तर त्याचा अर्थ असा नाही, की काही अस्तित्वातच नाहीये . कुत्र्यांना तर ऐकू येत असतं आणि इतर प्राण्यांना सुद्धा.  आणि मला अगदी पक्की खात्री आहे, की असेही आवाज आहेत, जे कुत्र्यांना सुद्धा ऐकू येत नसतील. पण त्यांच्या लहरी मात्र हवेत आहेत. कदाचित त्या कधीच थांबत नसतील. आणि अधिकाधिक बारीक होत जात असतील. कुठूनतरी येत असतील.”

“पाऊस पडतोय,” मी विचारले, “की नाही?”

“मला याचं उत्तर द्यायचं नाहीये ”

“कोणी तुझ्या डोक्यावर बंदूक रोखून उभा असेल तर?”

“कोण, तुम्ही?” “कोणीही. पावसाळी कोट आणि धुरकट चष्मा घातलेला कोणी इसम तुझ्या डोक्यावर बंदूक रोखून विचारतो आहे, ‘पाऊस पडतो आहे की नाही? बस, खरं सांगून टाक आणि मी माझी बंदूक हटवतो आणि पुढच्या फ्लाईटने मी इथून निघून जाईन.’मग काय सांगशील तू?”

“त्याला कोणतं सत्य हवं आहे? एका वेगळ्या तारकामंडळामध्ये प्रकाशाच्या वेगाने फिरणाऱ्या कोणाचं सत्य जाणून घ्यायचं आहे का त्याला? की एखाद्या न्युट्रॉन ताऱ्याभोवती चकरा मारणाऱ्या कोणाचं सत्य जाणून घ्यायचंय? असे लोक जर आपल्याला सूक्ष्मदर्शकाखाली बघू शकत असते, तर आपण त्यांना दोन फूट दोन इंच एवढे दिसलो असतो आणि शक्य आहे की आजच्या ऐवजी काल पाऊस पडत असता.”

“त्याने तुझ्या डोक्यावर बंदूक रोखलेली आहे. त्याला तुझं सत्य जाणून घ्यायचं आहे.”



“माझ्या सत्याला काय किंमत ? माझं सत्य अनावश्यक आहे. काय माहीत, हा इसम  कोणत्या तरी दुसऱ्याच सौरमंडळातल्या एखाद्या ग्रहावरून आला असेल. काय माहीत, ज्याला आपण ‘पावसाळा’ म्हणतो, त्याला तो ‘साबण’ म्हणत असेल. आपण ज्याला ‘सफरचंद’ म्हणतो, त्याला तो ‘पावसाळा’ म्हणत असेल. मग मी त्याला काय म्हणू?”

“समज, त्याचं नाव फ्रँक जे. स्मॉली आहे आणि तो सेंट लुईस शहरात राहतो आहे. त्याला ही माहिती हवी आहे, की *आत्ता*, या क्षणी पाऊस पडतो आहे की नाही?”

“आत्ता आणि इथेच.”

“आत्ता असं काही असतं का? आपण म्हणेपर्यंत ‘आत्ता’ येऊन गेलेला सुद्धा असतो. आत्ता पाऊस पडतो आहे, हे मी कसं म्हणू शकतो; कारण तुमचा तथाकथित ‘आत्ता’ मी म्हणताच ‘तेव्हा’ झालेला आहे?”

“तूच म्हणालास ना, की भूत, वर्तमान किंवा भविष्य काही नसतंच म्हणून.”

“ते फक्त कृतीतच असतं. तिथेच आपल्याला ते दिसत असतं.”

“पाऊस ही एक संज्ञा आहे. इथे, ठीक याच ठिकाणी, पुढच्या दोन मिनिटांत जेव्हा कधी तुला या प्रश्नाचं उत्तर द्यायचं असेल, सांग, पाऊस पडतो आहे की नाही?”

“स्पष्टपणे पाहता, चालत्या गाडीत बसून अगदी ह्याच ठिकाणाविषयी बोलत असाल, तर माझ्या मते हीच या चर्चेची समस्या आहे.”

“हाइनरिख, मला फक्त माझ्या प्रश्नाचं उत्तर दे, ओके?”

“जास्तीत जास्त मी फक्त अंदाज बांधू शकतो.”

मी म्हटलं, “ एकतर पाऊस पडतो आहे, किंवा नाही.”

“अगदी बरोबर, मला हेच सांगायचं आहे. तुम्ही फक्त अंदाज करू शकता. एका बाजूला सहा, दुसऱ्या बाजूला अर्धा डझन लावले.”

“अरे, पण पाऊस पडतो आहे.”

“तुम्ही आकाशात सूर्याला फिरताना पाहता. पण प्रत्यक्षात आकाशात सूर्य फिरतोय की पृथ्वी फिरतेय ?”

“मला ही तुलना पसंत नाही.”

“पाऊस पडतोय याची नक्की खात्री आहे तुम्हाला? तुम्हाला कसं माहीत की हे नदी पलीकडच्या कारखान्यांतून येणाऱ्या सल्फ्युरिक आम्लाचे थेंब नाहीत? तुम्हाला कसं ठाऊक, की चीनमधल्या एखाद्या लढाईमुळे हवामानात झालेली ही गडबड नाहीये? तुम्हाला तर इथेच आणि आत्ता उत्तर हवं आहे. तुम्ही इथेच आणि आत्ता हे सिद्ध करू शकता का, की हे पावसाचेच थेंब आहेत? तुम्ही ज्याला पावसाळा म्हणता, तो खरंच पावसाळा आहे, हे मला कसं कळणार? पाऊस म्हणजे नक्की काय असतो?”



“आकाशातून पडतो तो, आणि ज्याच्यामुळे आपण भिजतो, तो पाऊस असतो.”

“मी तरी नाही भिजलेलो. तुम्ही भिजला आहात का ?”

“वा, वा,” मी म्हटलं. “बहुत बढिया”

“नाही, नाही, मी अगदी गंभीरपणे विचारतोय. तुम्ही भिजला आहात का ?”

“फर्स्ट क्लास!,” मी त्याला म्हणालो. “अनिश्चितता, योगायोग आणि अव्यवस्था जिंकली. विज्ञानाचा सुवर्णकाळ.”

“तुम्ही चेष्टा करताय.”

“वाद घालणाऱ्या आणि कीस पाडणाऱ्या लोकांचा अफाट आनंद!”

“ठीक आहे. थट्टा करताय तुम्ही. मला काय.”

*हिंदी संदर्भ अंक १५९ (जुलै - ऑगस्ट २०२५) मधून साभार.*

ही कथा डॉन दलीलॉ यांच्या ‘व्हाईट नॉईज’ या कादंबरीतील सहाव्या प्रकरणातील एक भाग आहे. हाईनरिख आणि त्याच्या वडिलांमधील वादविवाद.

§§§

---

**लेखक : डॉन दलीलॉ**, अमेरिकन कादंबरीकार, लघुकथा लेखक, नाटककार, पटकथाकार  आणि निबंधलेखक. टेलिव्हिजन, अणुयुद्ध, डिजिटल युग, गणित, अर्थशास्त्र, खेळ इत्यादी विषयांवर लेखन, १९८५ साली लिहिलेल्या ‘व्हाईट नॉईज’ या कादंबरीला ‘राष्ट्रीय पुस्तक पुरस्कार’ प्राप्त.

**इंग्रजीतून अनुवाद : हरजिंदर सिंह ‘लाल्टू’.**

**हिंदीतून अनुवाद : संजीवनी आफळे**, शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी.

***(कळीचे शब्द : कथा, story, डॉन दलीलॉ)***